**अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.४, अहमदनगर यांचे न्यायालयात.**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २३५/२०२५** **नि.क्र.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | १८/१२/२०२४ |
| २. | प्रकरण दाखल केल्याचा दिनांक | :- | ०४/०१/२०२५ |
| ३. | फिर्यादीचे नाव | :- | **प्रगत शेतकरी केंद्र भागीदार** – महेश पोपटलाल बोरा, वय – ४२ वर्षे धंदा– व्यवसाय,रा. प्लॉट नं.९५, मार्केटयार्ड, अहमदनगर. |
| ४. | आरोपीचे नाव | :- | **रमणलाल धनराज गांधी**, वय – ५० वर्षे धंदा – व्यवसाय, रा. मु.पो.टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, अहमदनगर. |
| ५. | गुन्हा कलम | :- | पराक्राम्य दस्त अधिनियम कलम १३८ अन्वये |
| ६. | गुन्हयाचा तपशील | :- | |

ज्याअर्थी तुम्ही फिर्यादीकडून घेतलेल्या कायदेशीर देय रक्कमेच्या परतफेडीसाठी त्यांना दिनांक १८.११.२०२४ रोजी, रक्कम रूपये ७७,१३६/– चा धनादेश क्र.०१६४७० दिला होता. तुम्ही दिलेला धनादेश फिर्यादीने त्यांच्या बँक खात्यात वटविण्यासाठी टाकला असता तुमच्या **खात्यात पुरेशी रक्कम** नसल्यामुळे तो दिनांक १९.११.२०२४ रोजी बँकेच्या मेमोसह अनादरीत होऊन परत आला. त्याबाबत फिर्यादीने तुम्हाला दिनांक ०२.१२.२०२४ रोजी नोटीस पाठविली असता सदर नोटीसची तुम्हाला दिनांक ०३.१२.२०२४ मिळाली. परंतु तुम्ही विहीत मुदतीत वादातील धनादेशाची रक्कम परत न केल्यामुळे तुम्ही परक्राम्य दस्त अधिनियम, कलम १३८ प्रमाणे शिक्षापात्र अपराध केला आहे व वर नमुद शिक्षापात्र अपराधाकरिता तुमचे विरूध्द संपरिक्षा चालविण्यात येत आहे.

७.आरोपीचे प्रतिकथन :-

| | |
|---|---|
| प्रश्न क्र. :१ | तुम्हाला फिर्यादीने सादर केलेल्या नकला मिळाल्या काय ? |
| उत्तर | होय. |
| प्रश्न क्र. :२ | तुम्हाला आता जो कलम १३८ पराक्राम्य दस्त अधिनियम अन्वये गुन्हयाचा तपशील वाचून दाखविला तो तुम्हाला समजला काय ? |
| उत्तर | होय. |
| प्रश्न क्र. :३ | धनादेश तुमच्या खात्याचा असल्याचे तुम्हाला मान्य आहे काय ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न क्र. :४ | धनादेशावर तुमची सही असल्याचे तुम्हाला मान्य आहे काय ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न क्र. :५ | तुम्ही हा धनादेश फिर्यादीला दिला होता का ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न क्र. :६ | धनादेश पारित करताना त्यातील रक्कम फिर्यादीला देय असल्याचे तुम्हाला मान्य आहे काय |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न क्र. :७ | तुम्ही गुन्हा केल्याचे तुम्हाला मान्य आहे काय ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न क्र. :८ | जर तुमचे दायित्व तुम्ही नाकारत असाल तर तुमचा बचाव काय आहे?<br>अ) केवळ सुरक्षेसाठी दिलेला धनादेश, ब) कर्जाची पूर्ण परतफेड केली आहे.<br>क) धनादेशाचा गैरवापर केला आहे किंवा त्यात बदल केला आहे.<br>ड) इतर बचाव स्पष्टपणे लिहा |
| उत्तर | क) धनादेशाचा गैरवापर केला आहे किंवा त्यात बदल केला आहे, ड) इतर बचाव स्पष्टपणे लिहा |
| प्रश्न क्र. :९ | खटल्याच्या या टप्पयावर तुम्ही तडजोड करण्यास तयार आहात काय ? |
| उत्तर | नाही. |

आरोपीची सही / अंगठा

वर नमुद केल्याप्रमाणे आरोपीला त्याला समजेल अशा भाषेत गुन्हयाचा तपशील वाचुन व समजावुन सांगण्यात आला.

सही/-

( माधुरी रा. खनवे )

दिनांक ०३/०२/२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०४, अहमदनगर